सकाळ
सिंधुदुर्ग, सोमवार,
२५ एप्रिल २०२२

# तिलारीतील जैवविविधतेचे संवर्धन गरजेचे

## पर्यावरण अभ्यासक खानोलकर : दोडामार्ग महाविद्यालयात चर्चासत्र

दोडामार्ग, ता. २४ : तिलारीच्या जैवविविधतेवरील मानवी आक्रमण थांबायला हवे, असे मत बेळगाव येथील पर्यावरण अभ्यासक राहुल खानोलकर यांनी येथे व्यक्त केले. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या ''तिलारी परिसरातील जैवविविधता'' या विषयावर ते बोलत होते.

तालुक्यातील तिलारी नदीचे खोरे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध आहे. त्यावर मागील काही वर्षांपासून मानवी आक्रमण वाढत असून ते थांबले पाहिजे. तिलारीतील संपन्न परिसराचे रक्षण झाले पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, पर्यावरण अभ्यासक अमित सुतार, वनश्री फाउंडेशनचे अध्यक्ष संजय सावंत, भूगोल विभागप्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे आदी होते.

श्री. खानोलकर म्हणाले, "महाराष्ट्रातील मायरीस्टीकाची एकमेव जंगल किटकभक्षी वनस्पती तिलारी परिसरात आहे. तेथे झाडावरचे बेडूक व रंग बदलणाऱ्या वनस्पती आहेत. तिलारी परिसरात चार ते पाच हजार प्रकारचे कीटक, सात ते आठ प्रकारचे विंचू, दोनशेपेक्षा अधिक फुलपाखरू, भारतातील सर्वात मोठे दोन नंबरचे फुलपाखरू आणि जगातील सर्वात मोठा पतंग तिलारी परिसरात आहे. तीसपेक्षा अधिक बेडकाच्या जाती आणि गांडूळ यासारखे सरपटणारे प्राणी येथे आहेत. दहा ते बारा प्रकारच्या पाली, तीन ते चार प्रकारचे किंगफिशर, सहा ते सात प्रकारची घुबडे आणि स्वर्गीय नर्तक आहेत. तेथे अनेक प्रकारची वटवाघळे आढळतात. एक वटवाघूळ एका तासात पाचशेपेक्षा अधिक मच्छरांना खातो. त्यामुळे तो प्राणी मानवासाठी लाभदायक आहे. खेकडे, रानकुत्रे, तरस, गवे, भेकर, हरीण, अस्वल, डुक्कर आणि वाघही तेथे सापडतात. त्यांचे जतन आवश्यक आहे." प्राचार्य डॉ. सावंत म्हणाले, "समृद्ध तिलारी परिसराचे रक्षण व संवर्धन आपल्यासारखे तरुण करीत आहेत, ही कौतुकाची गोष्ट आहे. यापुढे आमचे महाविद्यालयही आपल्यासोबत अशा प्रकारचे काम करेल. येत्या काळात तो परिसर दिवसेंदिवस अधिक समृद्ध कसा होईल, यासाठी प्रयत्न करूया." यावेळी संजय सावंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गाथाडे यांनी केले. तर प्रा. श्रीपाद पाडगावकर यांनी आभार मानले.



दोडामार्ग : येथे मार्गदर्शन करताना राहुल खानोलकर.